दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.३१ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २६५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 31 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 265 | Pages 4 | Rate 4 Rs


## मी कुठेही जाणार नाही

**मुंबई**–महाराष्ट्रातील विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता केवळ दोन दिवस शिल्लक असल्याने राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा पक्षांतराचे वारे वाहू लागले असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते व माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांच्यासह माजी मंत्री राजेश टोपे हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. दरम्यान, भाजप प्रवेशाच्या या सुरू असलेल्या चर्चांवर खुद्द राजेश टोपे यांनी समोर येत आपली स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे. भाजप प्रवेशाच्या माझ्या बाबत येणाऱ्या बातम्या चुकीच्या आहेत. मी कुठेही जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.जालना जिल्ह्यातील घनसावंगी मतदारसंघाचे प्रमुख नेते आणि राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे हे लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले आहे.

# सरकारकडून मागण्या मान्य; १५ तासांनंतर जरांगेंचे उपोषण मागे

## सरकारी शिष्टमंडळाची जरांगेंसोबत चर्चा फळाला

दैनिक वादळ वार्ता

**वडीगोद्री(वृत्तसंस्था)**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे शेतात शनिवारी सकाळी भरउन्हात सुरू केलेले बेमुदत उपोषण १५ तासांनंतर सोडले. मराठा आरक्षण उपसमितीचे प्रमुख व मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार प्रसाद लाड आणि मराठा अभ्यासक व जरांगे यांच्यात रात्री १०.३० वाजेपासून चर्चा सुरू झाली. अडीच तासांच्या चर्चेनंतर सरकारने सर्व मागण्या मान्य असल्याचे सांगत २-३ दिवसांत त्यासंबंधी सूचनांचा शासननिर्णय काढू, असे आश्वासन दिले. त्यानंतर रात्री १ वाजता जरांगे यांनी उपोषण मागे घेतले.

आझाद मैदानावर केलेल्या आंदोलनाच्या १० महिन्यांनंतर जरांगे नवव्यांदा उपोषणाला बसले होते.

हे उपोषण मागे घेण्यासाठी सरकारच्या शिष्टमंडळाने १४ सूचनांचा प्रस्ताव जरांगेंना दिला. त्यावर दिवसभरात मराठा अभ्यासक व शिष्टमंडळात सकारात्मक चर्चा झाली. या चर्चेदरम्यान, सरकार त्यांच्या सर्व मागण्यांबाबत सकारात्मक असून, काही निर्णयांतील त्रुटी दूर करण्याचे आश्वासन शिष्टमंडळाने दिले. जरांगेंच्या सूचनांवर २ ते ३ दिवसांत कार्यवाही करून शासन निर्णय काढू, असे विखे पाटील म्हणाले.









## श्री महालक्ष्मी प्रतिष्ठान मार्फत एक महिन्याचे कॉस्मेटोलॉजी प्रशिक्षण संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**




दि.२९ मे २०२६ रोजी श्री महालक्ष्मी प्रतिष्ठान मार्फत पायल ब्युटी पार्लर केज येथे एक महिन्याचे कॉस्मेटोलॉजी प्रशिक्षण तरुण उद्योजक मुली व महिलांसाठी घेण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन श्री महालक्ष्मी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती संगीता इंगोले मॅडम व सचिव श्री.जी.बी.चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून पायल ब्युटी पार्लरच्या प्रो.प्रा. सायरा सय्यद मॅडम यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले यात त्यांनी कॉस्मेटोलॉजी म्हणजे ब्युटी पार्लर मध्ये असलेल्या विविध ट्रेनिंग फेशियल,ब्लिचिंग, क्लीनअप सारख्या विविध प्रकारच्या ट्रेनिंग चालू असलेल्या प्रशिक्षणा मधील प्रशिक्षणार्थींना सखोल सराव घेऊन शिकवले व कॉस्मेटोलॉजी हे भविष्यात नवीन उद्योजकांसाठी व्यवसायाचे एक साधन बनू शकते हे स्वतःच्या उदाहरणातून समजावून सांगितले.श्री जी.बी. चौधरी सर यांनी तरुण उद्योजकांसाठी शासना च्या असलेल्या विविध योजनांचे सखोल मार्गदर्शन उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थींना केले.

हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी समुपदेशक कु.तृप्ती शिंदे व सर्व प्रशिक्षणार्थींनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले.या कार्यक्रमास प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमात मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल श्री महालक्ष्मी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष कोषाध्यक्ष व सदस्यांनी आभार व्यक्त केले आहेत.


## खडकमांजरी गावात वानरांचा उच्छाद;नागरिक त्रस्त

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । प्रतिनिधी**

लोहा तालुक्यातील खडकमांजरी गावात गेल्या काही दिवसांपासून वानरांचा मोठ्या प्रमाणावर उच्छाद वाढला असून नागरिकांचे जीवन त्रस्त झाले आहे. शेत परिसरात वास्तव्यास असलेले वानर पाण्याच्या शोधात गावात येऊ लागल्याने गावकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

वानरांचे कळपच्या कळप गावात येऊन घरांच्या छतावर उड्या मारत आहेत. त्यामुळे घरावरील पत्रे व कौले खराब होत असून अनेक गरीब कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत आहे. वानरे घरांच्या छतावर धिंगाणा घालत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



याशिवाय वानरे घरात घुसून अन्नपदार्थ, भाकऱ्या तसेच इतर खाद्यपदार्थ खात आहेत. पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांमध्ये शिरून पाणी पित असल्याने पाणी दूषित होत आहे. त्यामुळे नागरिकांना स्वच्छ पाण्याच्या समस्येलाही सामोरे जावे लागत आहे.गावकऱ्यांनी अनेक वेळा वानरांना हाकलण्याचा प्रयत्न केला; मात्र वानरांची संख्या मोठी असल्याने त्यावर नियंत्रण मिळविणे कठीण झाले आहे. या वाढत्या समस्येमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून वन विभागाने तातडीने दखल घेऊन वानरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

वानरांच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान तर होतच आहे, शिवाय महिलांमध्ये, लहान मुलांमध्ये व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित प्रशासनाने त्वरित उपाययोजना करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावा


# खा.बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विखे-पाटील यांना थेट पत्र

### रखरखत्या उन्हात सुरू असलेल्या आंदोलनावरून वेधले सरकारचे लक्ष

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

मराठासमाजाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने संघर्ष करणारे मनोजदादा जरांगे - पाटील यांनी कालपासून रखरखत्या उन्हात पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसले आहे.त्यांच्या या आंदोलनामुळे राज्यातील कोट्यवधी मराठा बांधवां मध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून,राज्य सरकारने आता कोणताही वेळ न दवडता यावर तातडीने आणि सकारात्मक तोडगा काढावा,अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे.यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उप समितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांना थेट पत्र पाठवून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे की,मराठा समाजाच्या आरक्षणासह इतर प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मनोज दादा जरांगे-पाटील हे दीर्घकाळापासून शांततेच्या व लोकशाही मार्गाने लढा देत आहेत. त्यांच्या मागण्या मराठा समाजाच्या भावना आणि अपेक्षांशी थेट निगडित आहेत.मात्र, गेल्या अनेक महिन्यां पासून या मागण्यांवर राज्य सरकारकडून अपेक्षित निर्णय न झाल्यामुळे संपूर्ण मराठा समाजामध्ये तीव्र अस्वस्थता आणि कमालीची नाराजी वाढत असल्याचे खा.सोनवणे यांनी पत्रात नमूद केले आहे.सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून,अशा रखरखत्या उन्हात मनोज दादा जरांगे-पाटील यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.या उपोषणा मुळे त्यांच्या प्रकृतीवर अत्यंत विपरीत परिणाम होण्याची



मोठी शक्यता निर्माण झाली आहे. मनोजदादांच्या आरोग्या बाबत राज्यातील कोट्यावधी मराठा बांधव-भगिनी कमालीचे चिंतित आहेत.त्यामुळे राज्य सरकारने या विषयाची तातडीने गंभीर दखल घेऊन मनोज दादां शी सकारात्मक संवाद साधावा,त्यांच्या मागण्यांवर योग्य तो निर्णय घ्यावा आणि सुरू असलेल्या उपोषणाचा कायमस्वरूपी तोडगा काढावा,अशी आग्रही विनंती खासदारांनी केली आहे.पत्राच्या शेवटी खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्र्यांच्या कार्य पद्धतीवर विश्वास व्यक्त केला आहे.आपण एक संवेदनशील आणि जनहितकारी मुख्यमंत्री म्हणून या अत्यंत संवेदनशील प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष द्याल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.सरकार यावर नक्कीच न्याय्य मार्ग काढून समाजामध्ये विश्वासाचे व सकारात्मक वातावरण निर्माण करेल, अशी आशा खा.सोनवणे यांनी पत्राद्वारे व्यक्त केली आहे.

## स्वा.सावरकर जयंतीच्या निमित्ताने पेशवा प्रतिष्ठान तर्फे बिनव्याजी शैक्षणिक मदतीचे वाटप



दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

समाजातील गरजू गुणवंत विद्यार्थ्यांना पेशवा प्रतिष्ठान तर्फे बिनव्याजी शैक्षणिक मदत केली जाते.यावर्षी स्वातंत्रवीर सावरकर जयंती निमित्त पार्थ कानसुरकर यास बिनव्याजी शैक्षणिक मदतीचे वाटप करण्यात आले.मान्यवरांच्या हस्ते पन्नास हजार रुपयाचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.सर्वप्रथम स्वातंत्र्य वीर सावरकर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी माजी गट शिक्षण अधिकारी व्यंकटेश कुलकर्णी, विवेक देशमुख,राहुल कुलकर्णी,डॉ.महेश अकोलकर,शिरीष हिराळकर,डॉ.संकेत तोरंबेकर,विवेक बाभुळगावकर,श्रीकांत जोशी,अक्षय देशमुख, केदार दामोशन,गौरव कुलकर्णी,विलास कानसुरकर यांची उपस्थिती होती.

# संपादकीय

## सक्षम नेत्या, हुशार प्रशासक

अहिल्याबाई होळकर एक सक्षम नेत्या म्हणून उदयास आल्या. त्यांनी दूरदृष्टीने अनेक सामाजिक कामे केली. एक हुशार प्रशासक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. जलसंधारण, रस्त्यांच्या कडेची झाडे, स्थापत्यकलेतील अनेक कामे त्यांच्या दृरदष्टीची प्रतीके आहेत. ३१ मे रोजी पार पडणाऱ्या त्यांच्या जयंतीनिमित्त घेतलेला वेध.

अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहेत. केवळ स्थापत्य चमत्कारांसाठीच नव्हे, तर प्रगतिशील प्रशासनासाठी आणि केलेल्या दूरगामी सामाजिक सुधारणांसाठीही त्या प्रसिद्ध आहेत. १७६७ ते १७९५ पर्यंत राज्य करताना अहिल्याबाईंच्या कारकिर्दीत कल्याण, सामाजिक न्याय, मानवी समानता आणि शाश्वत विकासासाठी अढळ वचनबद्धता होती. त्यांनी उपेक्षित समुदायांना उन्नत करणारी धोरणे आखली. प्रगत शिक्षण दिले. आरोग्यसेवा सुधारली आणि आर्थिक वाढ साधत पायाभूत सुविधांची निर्मिती केली. अठरावे शतक हा भारतातील अशांततेचा काळ होता. त्यात राजकीय विखंडन, आर्थिक आव्हाने आणि सामाजिक अशांतता होती. या वातावरणात अनेक इतिहासकारांनी अहिल्याबाईंच्या बुद्धिमत्तेचे आणि नेतृत्वगुणांचे कौतुक केले. त्यांचे ‘शासन आणि व्यक्तिमत्त्व’ हे ज्ञान, करुणा आणि न्यायाचे मिश्रण होते. ब्रिटिश इतिहासकार कर्नल जेम्स ग्रँट डफ यांनी त्यांचे वर्णन ‘एक अतिशय बुद्धिमान महिला’ म्हणून केले आहे. त्यांच्याकडे विवेक आणि निष्पक्षतेने काम करण्याची वृत्ती होती. केवळ प्रादेशिक विस्तारापेक्षा सामाजिक कल्याणाला प्राधान्य देणाऱ्या शासक म्हणून त्यांची अद्वितीय भूमिका अनेक इतिहासकार अधोरेखित करतात. अहिल्याबाईंच्या वारशातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे शिक्षणक्षेत्रातील अग्रणी कार्य. सामाजिक सक्षमीकरणासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे, हे माहीत असल्याने, त्यांनी त्यांच्या राज्यात असंख्य शाळा आणि शिक्षण संस्था स्थापन केल्या. गतीसाठी महिला सक्षमी करण आवश्यक आहे हे समजून घेतले.‘माझ्या आजीसाठी, मुलीचे शिक्षण हे गरिबीतून बाहेर पडण्याचे तिकीट होते’ हा त्यांचा विश्वास लिंग समानतेबद्दलच्या आधुनिक चर्चेत अजूनही प्रतिध्वनित होत आहे. आज, अनेक संघटना आणि चळवळी मुलींसाठी दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतात. शैक्षणिक सुधारणांचा पाया रचून त्यांनी अनेकांचे जीवन बदलले आणि राज्याच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. आरोग्यसेवेतही अहिल्याबाईंचे योगदान उल्लेखनीय होते. त्यांनी सुलभ, स्वच्छ आणि समुदायाभिमुख आरोग्यसेवेची सुरुवात केली. त्या काळात सार्वजनिक आरोग्य ही संकल्पना फारशी प्रचलित नव्हती, तरीही त्यांनी रुग्णालये आणि दवाखाने स्थापन करून लोकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या. स्वच्छतेचा प्रचार करून त्यांनी त्या काळात एक क्रांतिकारी पाऊल उचलले. आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करून त्यांनी लोकांच्या गरजा पूर्ण केल्या आणि पुढील सार्वजनिक आरोग्य उपक्रमांसाठी मार्ग मोकळा केला. त्यांची दूरदृष्टी आजच्या ग्रामीण आणि वंचित घटकांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्येही दिसून येते.अहिल्याबाई होळकरांच्या कारकिर्दीत रस्ते, पूल आणि सार्वजनिक इमारतींसारख्या पायाभूत सुविधांचा मोठा विकास झाला. यामुळे व्यापार, आर्थिक वाढ आणि सामाजिक संपर्क सुलभ झाला तसेच दुर्गम भाग जोडले गेले. त्यांच्या या गुंतवणुकीमुळे राज्याची समृद्धी वाढली आणि अधिक परस्पर जोडलेला समाज निर्माण झाला. तसेच त्यांनी उपेक्षित समुदायांच्या उन्नतीसाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या आर्थिक मदत, निवारा आणि व्यावसायिक प्रशिक्षणावर त्यांचा भर होता. त्यांची धोरणे विशेषतः विधवा, अनाथ आणि आर्थिक अडचणींना तोंड देणाऱ्यांसाठी फायदेशीर होती. त्यामुळे असुरक्षित लोकसंख्येला संसाधने आणि संधी उपलब्ध होतील याची खात्री झाली. सामाजिक कल्याणाप्रती अहिल्याबाईंचा दृष्टिकोन समग्र होता. त्यांना माहीत होते, की खऱ्या सक्षमीकरणासाठी आर्थिक पाठबळ आवश्यक आहे; परंतु कौशल्यांचा विकास आणि चांगले सामाजिक एकीकरणदेखील आवश्यक आहे. अहिल्याबाईंनी स्वयंपूर्णता, प्रतिष्ठा आणि समावेशकतेला प्राधान्य देत वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. पर्यावरणपूरक विकास, शेतीतील चांगल्या पद्धती आणि संसाधन व्यवस्थापन यांद्वारे त्यांनी शाश्वततेचे महत्त्व अधोरेखित केले. भिल्ल समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी शाळा, हस्तकला आणि व्यावसायिक प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून शिक्षण व आर्थिक विकासाला चालना दिली. त्यामुळे दुर्लक्षित घटकांना सक्षम बनवून राज्याच्या सामाजिक-आर्थिक विकासात त्यांचा सहभाग वाढवला.अहिल्याबाई होळकरांचा प्रभाव आजही माहेश्वरी साडी आणि पारंपरिक कलांच्या जतनात दिसून येतो. त्यांच्या पाठिंब्यामुळे माहेश्वरी साडी भारताच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक बनली. आजचे उपक्रम पारंपरिक कला आणि आधुनिक बाजारपेठ यांची सांगड घालून कारागिरांना योग्य वेतन व शाश्वत उपजीविका देण्याचा प्रयत्न करतात. शाश्वत कापूस लागवड, सेंद्रिय शेती आणि पारंपरिक कलांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम अहिल्याबाईंच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या विचारांचे प्रतिबिंब आहेत. हे उपक्रम शेतकऱ्यांना प्रशिक्षण, सुधारित बियाणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाची मदत देतात. अहिल्याबाई कला आणि स्थापत्यकलेच्या मोठ्या संरक्षक होत्या. त्यांनी अनेक मंदिरे, किल्ले आणि सार्वजनिक स्मारके उभारली. महेश्वर किल्ला आणि मंदिर संकुलाची पुनर्बांधणी हे त्यांचे महत्त्वाचे कार्य मानले जाते. त्यांच्या आश्रयामुळे संगीत, नृत्य आणि इतर कलांचाही विकास झाला व सांस्कृतिक वातावरण समृद्ध झाले. अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनाचा आणि कारकिर्दीचा विचार करताना, त्यांचे शासन मॉडेल समकालीन समाजासाठी महत्वाचे धडे देते. अहिल्याबाईंचा वारसा सामाजिक न्याय आणि समानता वाढवण्यात दूरदर्शी नेतृत्वाच्या प्रभावाचा पुरावा आहे. उपेक्षित समुदायांचे उत्थान, शिक्षणाला प्रोत्साहन आणि आर्थिक संधींना प्रोत्साहन देण्याची त्यांची वचनबद्धता आजच्या प्राधान्यांशी सुसंगत आहे. राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे चारित्र्य आणि प्रशासन कल्याण, शिक्षण आणि चांगल्या सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रदान करण्यावर केंद्रित नेतृत्वशैलीचे उदाहरण आहे. सामाजिक कल्याण आणि समावेशकतेच्या तत्त्वांवर आधारित अहिल्याबाईंच्या दूरदर्शी धोरणांनी संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांची पूर्वछाया दाखवली. खरे नेतृत्व केवळ सत्ता धारण करण्याबद्दल नाही, तर सर्वात असुरक्षित लोकांचे संरक्षण आणि उत्थान करण्याबद्दल आहे, याची चुणूक त्यांचे जीवन आपल्याला दाखवते.

# पुणे आणि पिंपरी-चिंचवड विषारी दारू दुर्घटनेची तीव्रता वाढली: मृतांचा आकडा वाढला

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात संशयित विषारी दारूमुळे मृत्यूंचे सत्र सुरूच असून मृतांचा आकडा वाढत असल्याने संपूर्ण परिसर हादरला आहे. आनंदवन, काटेवस्ती, संजयनगर, आझाद चौक आणि जय महाराष्ट्र चौक परिसरात या घटनेने भीती, संताप आणि शोकाचे वातावरण निर्माण झाले आहे.या दुर्घटनेतील सर्वाधिक हृदयद्रावक घटना फुगेवाडी येथे घडली. विजय राठोड आणि विजू राठोड या दोन सख्ख्या भावांचा कथित विषारी दारू पिल्याने मृत्यू झाला. तर त्यांचे वडील प्रकाश राठोड यांनीही त्याच दारूचे सेवन केल्याने त्यांची दृष्टी गेली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



या घटनेमुळे राठोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दोन्ही भाऊ हे कुटुंबाचे प्रमुख आधारस्तंभ होते. त्यांच्या पश्चात लहान मुले असून पत्नी सारिका आणि संगीता राठोड यांनी प्रशासनाकडे न्याय आणि तातडीच्या आर्थिक मदतीची मागणी केली आहे. आमचे पती आम्हाला सोडून गेले आता मुलांचे शिक्षण आणि संसार कसा चालवायचा? असा आर्त सवाल त्यांनी उपस्थित केला.दरम्यान, अकबर अझीम खान पठाण यांना बुधवारी रात्री प्रकृती बिघडल्याने ‘वायसीएम’ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान गुरुवारी त्यांचा मृत्यू झाला. तसेच राजेश राजपूत यांचाही गुरुवारी सकाळी अचानक मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात दोन मुली आहेत. आनंद निकाळजे आणि आनंद देसाई या आणखी दोघांचा उशिरा मृत्यू झाल्याने मृतांचा आकडा आणखी वाढला आहे. सर्व मृतांचे शवविच्छेदन वायसीएम रुग्णालयात करण्यात आले.

हडपसरमधील पांढरे मळा परिसरातूनही अशीच घटना समोर आली आहे. अनधिकृत दारू अड्ड्यावरून खरेदी केलेली दारू प्यायल्याने पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. मद्यपानानंतर पीडितांना पोटदुखी, मळमळ आणि अचानक प्रकृती खालावल्याची लक्षणे दिसून आली होती.या घटनेनंतर स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. परिसरात अनेक दिवसांपासून बेकायदेशीर दारूची विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याबाबत पोलिसांकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई झाली नसल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे. काहींनी पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलीस आयुक्तांशी चर्चा झाल्याचे सांगितले. विषारी दारूचा स्रोत शोधण्यात आला असून या प्रकरणी अनेकांना अटक करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. ही अत्यंत गंभीर घटना असून विषारी दारू तयार करणारे आणि पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. हा प्रकार म्हणजे खुनापेक्षा कमी नाही, असे त्यांनी म्हटले.अमितेश कुमार यांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगितले असून तपास युद्धपातळीवर सुरू असल्याचे स्पष्ट केले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून पुरवठा साखळीतील प्रत्येक व्यक्तीचा शोध घेतला जात आहे. यापूर्वीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्याचे आढळल्यास संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवरही कारवाई होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या दुर्दैवी घटनेमुळे बेकायदेशीर दारू विक्री, प्रशासनाची निष्काळजीपणा आणि कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी पुन्हा एकदा ऐरणीवर आल्या असून मृतांच्या कुटुंबीयांकडून दोषींवर कठोर कारवाईसह न्यायाची मागणी होत आहे.

# संगमेश्वर पोलिसांच्या आदेशालाही पोलिस पाटलाने दाखवली केराची टोपली

### जबरदस्तीने बंद घराचे कुलूप फोडून परस्पर ठेवला होता भाडेकरू

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यातील सौ. स्मिता जुवेकर यांच्या शिवणे ग्रामपंचायत हद्दीतील बंद घरात गावचे पोलिस पाटील मनोज शिंदे यांनी घरमालकांची पूर्वपरवानगी न घेता जबरदस्तीने कुलूप फोडून परस्पर भाडेकरू ठेवला असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.सविस्तर हकीकत अशी की, सौ. स्मिता जुवेकर या आपल्या पतीसह कामानिमित्त देवरुख येथे वास्तव्यास आहेत. त्यांना माहेराहून वारसा हक्काने मिळालेले जुने घर मोडकळीस आल्याने ग्रामपंचायत कार्यालयामार्फत त्यांना घरकुल मंजूर करण्यात आले होते.. त्यानुसार सदर घराचे बांधकाम पूर्ण करण्यात आले होते.

सध्या हे घर बंद असून, स्मिता जुवेकर या अधूनमधून आपल्या पती व मुलासह त्या ठिकाणी वास्तव्यास येत असत. मात्र बुधवार दि. २७ मे रोजी गावचे पोलिस पाटील मनोज शिंदे यांनी कोणतीही पूर्वपरवानगी न घेता बंद घराचे कुलूप फोडून परस्पर भाडेकरू ठेवला असल्याचे संबंधित महिलेच्या निदर्शनास आले.हा प्रकार लक्षात येताच सौ. स्मिता जुवेकर यांनी तात्काळ संगमेश्वर पोलिस ठाणे तसेच देवरुख तहसीलदार कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली..तक्रारीची दखल घेत संगमेश्वर पोलिसांनी शिवणे गावचे पोलिस पाटील मनोज शिंदे यांना समक्ष बोलावून चौकशी केली व तात्काळ घर खाली करून संबंधित महिलेला




घराचा ताबा देण्याचे निर्देश दिले..त्यावेळी पोलिस पाटील यांनी पोलिसांसमोर घर खाली करून सदर घर महिलेच्या ताब्यात देण्याचे कबूल केले होते. मात्र दोन दिवस उलटूनही ना भाडेकरू हटवण्यात आला, ना घराचा ताबा संबंधित महिलेला देण्यात आला ..या घटनेमुळे संगमेश्वर तालुक्यात संतापाची लाट पसरली असून संबंधित पोलिस पाटलाच्या निलंबनाची मागणी जोर धरत आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणामुळे संगमेश्वर पोलिस बघ्याची भूमिका घेत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.खुद्द गावचा पोलिस पाटीलच कायदे, नियम आणि अटी धाब्यावर बसवत असेल, तर सामान्य नागरिकांनी न्यायासाठी कोणाकडे दाद मागायची? असा सवाल संगमेश्वरवासीयांकडून उपस्थित केला जात आहे.या घटनेमुळे पोलिस पाटील पदाचा गैरवापर झाल्याचा आरोप होत असून संबंधितांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंक्स वॉटरने सादर ‘रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस’

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने ‘ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस’चे अनावरण केले आहे, जे सर्व इंद्रियांच्या माध्यमातून - चवीचा कसा अनुभव घेतला जातो - याची पुनर्रचना करण्यासाठी तयार केलेले एक नवीन सांस्कृतिक व्यासपीठ आहे. अशा वेळी जेव्हा ग्राहक अधिक अर्थपूर्ण आणि उच्च दर्जाच्या अनुभवांकडे आकर्षित होत आहेत - जे त्यांच्या स्वतःच्या विकसित होत असलेल्या आवडीनिवडी आणि निवडी प्रतिबिंबित करतात, ‘ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस’ चवीला अधिक अर्थपूर्ण रूपात बदलून या बदलाला प्रतिसाद देत आहे. ‘रिझर्व्हड इन एव्हरी सेन्स’ या कल्पनेवर आधारित, हे व्यासपीठ चवीला एका बहु-आयामी प्रवासाच्या रूपात सादर करते - असा प्रवास ज्याचा केवळ आस्वादच घेतला जात नाही, तर तो पाहिला, ऐकला, स्पर्श केला आणि अनुभवला जाऊ शकतो. शेफ कुणाल कपूर यांच्यासोबत तयार केलेल्या या अनुभवाने एका जिव्हाळ्याच्या आणि विशेष सादरीकरणाद्वारे ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. या संध्याकाळच्या केंद्रस्थानी एक लाईव्ह पाककला सादरीकरण होते, जिथे संगीत आणि ताल यांच्यासोबत चवीचा मेळ घालत टेक्श्चर, सुगंध आणि रिदम यांचे अखंड संवेदी एक्सप्रेशनमध्ये रुपांतर करण्यात आले. या अनुभवाचे वैशिष्ट्य




म्हणजे चवीचे जिभेच्या पलीकडचे केलेले सादरीकरण - मंत्रमुग्ध करणाऱ्या जागांच्या एका मालिकेच्या माध्यमातून, जिथे गतिमान दृश्य वातावरण आणि सुगंधावर आधारित इंस्टॉलेशन्सपासून ते स्पर्शज्ञान शोध आणि तयार केलेल्या चवीच्या अनुभवापर्यंत, प्रत्येक ठिकाणी एका वेगळ्या दृष्टिकोनातून चवीची व्याख्या करण्यात आली होती.पर्नोड रिकार्ड इंडियाच्या CMO देवश्री दासगुप्ता पुढे म्हणाल्या, आजचे ग्राहक अधिक हेतुपूर्ण आणि उच्च दर्जाच्या अनुभवांच्या शोधात आहेत, जे केवळ गरजेच्या पलीकडे जाणारे आणि खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण वाटणारे असतील. ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेसच्या माध्यमातून, आम्ही एक असे सांस्कृतिक व्यासपीठ तयार करत आहोत जे या बदलाला प्रतिसाद देते, तसेच चवीची खोली आणि गुंतागुंत मंत्रमुग्ध करणाऱ्या, बहु-संवेदी अभिव्यक्तींमध्ये रूपांतरित करते. आपले ग्राहक आज ज्या प्रकारे जोडले जाऊ इच्छितात, जिथे शोध अधिक समृद्ध, आकर्षक आणि प्रत्येक अर्थाने 'रिझर्व्हड' असतो, त्याचाच हा एक नैसर्गिक विस्तार आहे.

# बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पेट्रोल डिझेल दरवाढी विरोधात आंदोलन

### इंधन टंचाई व दरवाढ तत्काळ कमी करा-राहुल सोनवणे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राज्यामध्ये मागील काही दिवसांपासून पेट्रोल डिझेल गॅसचा तुटवडा मोठ्या प्रमाणात सुरू असुन आज बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड येथे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे म्हणाले की, सध्या शेतीच्या मशागतीचे दिवस सुरू असून पेट्रोल डिझेल टंचाई व दरवाढ सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान व मानसिक हानी सुरू आहे मात्र पंतप्रधान मोदी परदेशात जावून चॉकलेट वाटण्याचे लाजिरवाणे काम करत आहेत. मागील १२ वर्षापासून देशात आणि राज्यात भाजपची एक हाती सत्ता असताना देखील महागाईवर कुठलेही नियंत्रण यासरकरचे दिसत नाही. लोकहिताच्या कुठल्याही योजना न आणता मन की बात करत देशातील जनतेची फसवणुक करण्याचे काम नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्ष करत असुन वाढलेली महागाई हे या सरकारचे नाकरते पणाचे लक्षण आहे. जर इंधनाचा तुटवडा कमी करून दरवाढ कमी नकेल्यास येणाऱ्या काळात बीड जिल्ह्या काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले यावेळी प्रवीणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे, दादासाहेब मुंडे, गणेश राऊत, गणेश बजगुडे, महावीर मस्के, परवेज कुरेशी, मीनाक्षी ताई पांडुळे, दत्ता कांबळे, संभाजी जाधव, प्रकाश मुंडे, राहुल जाधव, प्रवीण खोडसे, सय्यद फारुख, आकाश गायकवाड, शिवाजी कोटुळे,शिवाजी देशमुख, इलियास टेलर, शेख मोहसिन, शेख अमर, गणेश कारंडे, शेख नौशाद, अशोक केदार, अशोक बहिरवाल, विशाल मस्के, हरिभाऊ सावंत, राम शेळके, शेख मुशर्रफ, अविनाश दरपे, उद्धव जोगदंड, विजय पवार, कल्याण टेकाळे, विष्णू मस्के, मनोहर गीते, शेख जाहीर, शाम मुंडे, दीपक कराड, जमील खान यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.




# आमदार प्रमोद जठार यांनी महापौर रितू तावडे यांच्या भेटीत विविध विषयांवर चर्चा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

आमदार प्रमोद शंताराम जठार यांनी शुक्रवारी मुंबईच्या महापौर रितू तावडे यांची सदिच्छा भेट घेऊन मुंबईतील महिला सक्षमीकरण, आरोग्य व्यवस्था, पायाभूत सुविधा आणि पर्यटन विकासाशी संबंधित चार महत्त्वपूर्ण विषयांवर आज सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी विविध मागण्यांचे निवेदन महापौरांकडे सादर केले. त्यानंतर बृहन्मुंबई भाजपा कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी या मागण्यांची माहिती माध्यम प्रतिनिधींना दिली. मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक आणि लोकाभिमुख उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी जठार यांनी नमूद केले.महिला बचत गटांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुंबईतील प्रमुख ठिकाणी कोकण हाट किंवा महिला बचत गट केंद्र उभारण्यात यावे, अशी प्रमुख मागणी आमदार जठार यांनी केली. सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या पारंपरिक खाद्यपदार्थ, हस्तकला आणि विविध उत्पादनांना मुंबईत कायमस्वरूपी विक्री केंद्र उपलब्ध झाल्यास हजारो महिलांना आर्थिक स्थैर्य, स्वावलंबन आणि रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील महिलांच्या उत्पादनांना शहरी बाजारपेठ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी 'रुग्ण कल्याण निधी' स्थापन करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली. मुंबईकरांच्या सेवेसाठी दिवस-रात्र कार्यरत असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांना गंभीर आजारांवर उपचार करताना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे पालिकेच्या माध्यमातून विशेष 'कामगार कल्याण निधी' उभारून कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना तातडीची



आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेला प्राधान्य दिल्यास त्यांच्या कामाच्या कार्यक्षमतेतही वाढ होईल, असे त्यांनी नमूद केले.याशिवाय मुंबईतील केईएम, नायर, सायन आणि टाटा हॉस्पिटलमध्ये राज्यभरातून लाखो रुग्ण उपचारासाठी येत असतात. या रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांना राहण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना रस्त्यावर, फुटपाथवर किंवा उघड्यावर रात्री काढाव्या लागतात. या पार्श्वभूमीवर संबंधित रुग्णालयांच्या परिसरात तातडीने 'नाईट शेल्टर' उभारून स्वच्छ निवारा, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी जठार यांनी केली. या निर्णयामुळे हजारो गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी सांगितले.पर्यटन विकासाच्या दृष्टीने मुंबईतील गोराई आणि भायखळा येथील राणीबाग परिसरासाठी 'मिनी टॉय ट्रेन' सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्तावही त्यांनी मांडला. गोराई ते मनोरी दरम्यान सुरू होणाऱ्या या प्रकल्पामुळे पर्यटकांना आकर्षक, सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. यामुळे या परिसरातील पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल तसेच स्थानिक कोळी बांधव, युवक आणि नागरिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुंबईच्या पर्यटन विकासात हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# संघर्षातून घडलेले युवकच विकसित भारताचे स्वप्न साकारू शकतात; आमदार सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केला विश्वास

## लोकशाहीच्या चारही स्तंभांच्या समन्वयातूनच देशाची प्रगती; UPSC गुणवंतांच्या गौरव सोहळ्यात मार्गदर्शन


दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | अरविंद बनसोडे कुरनूरकर**

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याची सर्वाधिक क्षमता सामान्य कुटुंबातून संघर्ष करत पुढे येणाऱ्या तरुणांमध्ये असून, देशाच्या भवितव्याची खरी आशा ही युवकांमध्येच आहे, असा विश्वास विधानपरिषद आमदार सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केला.युवा उत्थान फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'ध्येय ज्ञानसाधनेचे, सुशासनाचे प्रशासक' या केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षेतील गुणवंतांच्या गौरव सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी खासदार तथा माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री नारायण राणे , म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल (IAS), उद्योगपती निरंजन हिरानंदानी, अतिरिक्त आयुक्त मल्लिनाथ जेउरे (IRS) यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार तांबे म्हणाले की, आज यूपीएससीसह विविध क्षेत्रांत यश मिळवणाऱ्या तरुणांचा अभ्यास केला तर त्यातील बहुतांश युवक हे शेतकरी, शिक्षक, सरकारी कर्मचारी किंवा मध्यमवर्गीय कुटुंबांमधून आलेले दिसतात. संघर्षातून उभी राहिलेली ही पिढीच विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याची ताकद बाळगते. त्यामुळे युवकांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्य, परिश्रम आणि जिद्द या



मूल्यांचा अंगीकार करणे आवश्यक आहे.

लोकशाही व्यवस्थेचा उल्लेख करताना त्यांनी विधिमंडळ, कार्यपालिका, न्यायव्यवस्था आणि माध्यमे या चारही स्तंभांच्या परस्पर समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले. लोकशाहीची गाडी या चार चाकांवर चालते. यापैकी कोणताही घटक स्वतःला सर्वश्रेष्ठ समजून स्वतंत्रपणे काम करू शकत नाही. विधिमंडळ, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि माध्यमे यांनी एकमेकांना पूरक ठरत जबाबदारीने काम केल्यासच देशाची प्रगती शक्य आहे. या चारही स्तंभांनी समन्वयाने काम केले तरच लोकशाही अधिक बळकट होईल आणि विकसित भारताचे स्वप्न साकार होईल, असे ते म्हणाले.

यूपीएससीमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांकडून समाजाला मोठ्या अपेक्षा असल्याचे सांगत त्यांनी प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि लोकहिताची जाणीव ठेवून काम करण्याचे आवाहन केले. आज तुम्ही प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्याची संधी मिळवली आहे. या संधीचे राष्ट्रसेवेत रूपांतर करणे हीच खरी जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी खासदार नारायण राणे यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना प्रशासनातील अधिकाऱ्यांनी कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देत काम करण्याचे आवाहन केले. देशाच्या प्रगतीत सक्षम प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.


# बृहन्मुंबई महानगरपालिका पवई येथील फुकट नगर आणि मिलिंद नगर परिसरातील सुमारे २५० अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज या पवई येथील फुकट नगर आणि मिलिंद नगर परिसरात असलेल्या जल अभियंता विभागाच्या जागेवरील सुमारे २५० अनधिकृत बांधकामांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एस' प्रशासकीय विभाग (वॉर्ड) आणि जल अभियंता विभागामार्फत संयुक्तपणे निष्कासनाची कारवाई करण्यात आली.उपायुक्त (परिमंडळ ६) श्री. संतोषकुमार धोंडे यांच्या मार्गदर्शनात आणि सहायक आयुक्त श्रीमती समरिन सैय्यद यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

सदर परिसरात शासकीय जागेवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे उभारण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई हाती घेण्यात आली. संबंधित



जागा अतिक्रमणमुक्त करून तिचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने नियोजनबद्ध पद्धतीने ही मोहीम राबविण्यात येत आहे.

या कारवाईसाठी सुमारे १५० पोलीस कर्मचारी, 'एस' विभाग आणि जल अभियंता विभागातील सुमारे ५० अभियांत्रिकी अधिकारी व कर्मचारी, २०० मजूर तैनात होते. तसेच ७ जेसीबी, १० डंपर आणि इतर लहान मालवाहू वाहनांच्या साहाय्याने ही कारवाई करण्यात आली.कारवाईदरम्यान अनधिकृत बांधकामे हटवून जागा पूर्णपणे मोकळी करण्यात येत आहे. अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया पूर्ण होताच संबंधित जागेभोवती कुंपण उभारण्याचे कामदेखील तातडीने हाती घेण्यात येणार असून, पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.

दरम्यान, शासकीय व महानगरपालिका मालकीच्या जागांवरील अतिक्रमणा विरोधातील कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पायथ्याशी गर्दी आणि शिखरावर नेहमी जागा असते; संघर्षावर मात करत कांचन वानखेडेची मुंबई पोलिस खात्यात भरारी

दैनिक वादळ वार्ता

**यवतमाळ | प्रतिनिधी**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाचं शिखर गाठणाऱ्या कांचन मायाबाई विजयराव वानखेडे हिची मुंबई पोलिस खात्यात निवड झाली असून, परिसरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पायथ्याशी गर्दी आणि शिखरावर नेहमी जागा असते या उक्तीला कांचनने आपल्या संघर्षमय प्रवासातून खऱ्या अर्थाने पूर्णत्वास नेलं आहे.लहानपणीच वडिलांचं छत्र हरपल्यामुळे कांचनच्या आयुष्यात अनेक संकटं आली. अत्यंत गरीब परिस्थितीत शिक्षण घेताना तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र परिस्थितीसमोर हार न मानता तिने आपल्या ध्येयाकडे वाटचाल सुरू ठेवली. ऊन-वारा, दुःख आणि संघर्ष सहन करत तिने मेहनतीची कास सोडली नाही.या प्रवासात भावाची मिळालेली भक्कम साथ आणि अमोलजी यांचं मार्गदर्शन कांचनसाठी प्रेरणादायी ठरलं. त्यांच्या सहकार्यामुळे आणि स्वतःच्या जिद्दीच्या जोरावर एक दिवस यश नक्की मिळेल हा विश्वास तिने



कायम ठेवला. अखेर तिच्या अथक प्रयत्नांना यश मिळालं आणि तिची मुंबई पोलिस खात्यात निवड झाली.कांचनच्या यशामुळे कुटुंबात आनंदाचं वातावरण निर्माण झालं असून, आईच्या डोळ्यात आलेले आनंदाश्रू सर्वांनाच भावूक करून गेले. यश संपादन करूनही नम्रपणे सर्वांचे आभार मानणाऱ्या कांचनचं सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दरम्यान, कांचन वानखेडे ही आज ग्रामीण भागातील अनेक तरुणींसाठी प्रेरणास्थान बनली असून, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर कोणतंही ध्येय गाठता येतं, हे तिने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवलं आहे.

# माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांची वाणी कुटुंबीयांना सांत्वनपर भेट

दैनिक वादळ वार्ता

**झरेकाठी | वार्ताहर**

संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील हभप कै. सिताराम शंकर वाणी यांचे नुकतेच वृद्धापकाळाने वयाच्या ७० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी वाणी परिवाराच्या निवासस्थानी भेट देत सांत्वन केले व श्रद्धांजली अर्पण केली.कै. सिताराम वाणी आणि त्यांच्या पत्नी सरस्वती वाणी हे अतिशय धार्मिक वृत्तीचे होते. त्यांना भजन आणि कीर्तनाची विशेष आवड होती. अत्यंत कष्टातून त्यांनी आपला संसार उभा केला. गेल्या दीड ते दोन वर्षांच्या आजारपणात पत्नी सरस्वती वाणी यांनी पतीची अतिशय निष्ठेने सेवा करत समाजापुढे आदर्श निर्माण केला.



यावेळी बाळासाहेब थोरात यांनी कुटुंबीयांची विचारपूस करून त्यांना धीर दिला. तसेच झरेकाठी गावातील कै. पहिलवान आनंदराव हरी वाणी, कै. अनिल शहाजी वाणी, कै. सुभाष पंढरीनाथ वाणी तसेच कै. डॉ. नानासाहेब विठ्ठल वाणी यांच्या आई यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांचीही सांत्वनपर भेट घेतली.कै. सिताराम शंकर वाणी यांच्या पश्चात पत्नी सरस्वती सिताराम वाणी, मुलगा रमेश सिताराम वाणी (प्रोजेक्ट मॅनेजर, बडोदा, गुजरात), ज्ञानेश्वर सिताराम वाणी (पत्रकार व ग्रंथपाल, ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, किल्ला, रोहा, रायगड), मुलगी नंदा ऊर्फ वैशाली सुरेश मोरगे, भाचा गोरक्षनाथ आण्णासाहेब शिंदे पाटील (गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर, अहिल्यानगर), भाची ड. शोभाताई संजय म्हस्के (राहाता कोर्ट), सुना प्राध्यापिका वैशाली रमेश वाणी, वर्षा ज्ञानेश्वर वाणी (कंपनी सुपरवायझर, रोहा, रायगड) तसेच मोठा परिवार आहे.

# रामभाऊ डिगे यांना 'नाभिक समाज रत्न' पुरस्काराने गौरव

दैनिक वादळ वार्ता

**इंदापूर | प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ सोलापूर शहर व ग्रामीण समाजोन्नती फाउंडेशन, सोलापूर यांच्या वतीने यावर्षीचा मानाचा नाभिक समाज रत्न पुरस्कार सोलापूर येथील रामभाऊ डिगे यांना प्रदान करण्यात आला. वयाच्या विसाव्या वर्षापासून नाभिक समाजासाठी निष्ठेने व सातत्याने कार्य करणारे रामभाऊ डिगे यांनी समाज प्रगतीसाठी मोठे योगदान दिले आहे. समाज उन्नतीसाठी सतत धडपड आणि जिद्दीने काम करणाऱ्या रामभाऊ डिगे यांच्या कार्याची दखल घेत त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार खासदार प्रणिती शिंदे, महाराष्ट्र राज्य



ओबीसी नेते तथा महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे अध्यक्ष कल्याण रावजी दळे, स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष बापूसाहेब अडसूळ, वैभव शेटे तसेच नाभिक समाजातील मान्यवर आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांना शाल, श्रीफळ, ट्रॉफी आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.सत्काराला उत्तर देताना रामभाऊ डिगे म्हणाले, मी समाजासाठी केलेल्या अहोरात्र सेवेची ही पोचपावती आहे. यापुढेही समाजासाठी अशीच निष्ठेने सेवा करत राहीन.या कार्यक्रमासाठी सोलापूर तसेच पुणे जिल्ह्यातील नाभिक समाजाचे पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात अंमली पदार्थ प्रतिबंधासाठी प्रभावी उपाययोजना करा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नार्को-कोऑर्डिनेशन समितीची बैठक

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

जिल्ह्यात अंमली पदार्थाची विक्री, वाहतूक, साठवणूक आणि वापराला आळा घालण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली नार्को - कोऑर्डिनेशन समिती गठीत करण्यात आली आहे. अंमली पदार्थाच्या प्रतिबंधासाठी विविध विभागाला नेमून दिलेली जबाबदारी गांभिर्याने पार पाडावी तसेच प्रभावी उपाययोजनेच्या माध्यमातून चंद्रपूर जिल्हा नशामुक्त करण्याच्या दृष्टीने सर्वांनी समन्वयाने काम करावे, अशा सुचना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिल्या.पोलिस विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात आज (दि.२९) आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, तहसीलदार विजय पवार, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक नितीन धार्मिक, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, पोलिस निरीक्षक अमोल बारापात्रे आदी उपस्थित होते.तरुणांमध्ये अंमली पदार्थाचे सेवन वाढल्याचे निदर्शनास येते, ही अतिशय गंभीर बाब आहे, असे सांगून जिल्हाधिकारी पंत म्हणाल्या, जिल्ह्यामध्ये अंमली पदार्थाची विक्री, वाहतूक व साठवूणक होणार नाही, याची दक्षता घ्या. शाळा, महाविद्यालय आणि खाजगी शिकवणी वर्गाच्या परिसरात विशेष गस्त ठेवा. तसेच विद्यार्थ्यांचे वसतिगृह परिसरातसुद्धा निगराणी ठेवावी. मेडीकल दुकानातून नशा करणारे ड्रग्ज अवैधरित्या विकले जात असेल तर त्यावर त्वरीत कारवाई करा. अचानकपणे मेडीकल दुकानांना भेट देऊन तपासणी करावी. शाळा - महाविद्यालयाच्या परिसरात प्रतिबंधात्मक पदार्थांची विक्री होणार नाही, याची खात्री करावी. तसेच अंमली पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.

विविध विभागांनी करावयाची कार्यवाही : शिक्षण विभागाने शाळा महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये अंमली पदार्थ, दारू, तंबाखुचे सेवन होणार



नाही, याकडे लक्ष द्यावे. तसेच अंमली पदार्थ प्रतिबंधाबाबत निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पथनाट्य, रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करावी. सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासनाने जिल्ह्यातील सुरू व बंद असलेल्या कारखान्यांची तसेच मेडीकल स्टोअर्सला अचानकपणे भेट देऊन अवैधरित्या होणा-या ड्रग्ज विक्रीची तपासणी करावी. जिल्ह्यात शेतांमध्ये खसखस किंवा गांजाची लागवड होणार नाही, याबाबत कृषी विभागाने दक्षता घ्यावी. अंमली पदार्थ सेवन करून रुग्णालयात आलेल्या रुग्णांची माहिती आरोग्य विभागाने त्वरीत पोलिस प्रशासनाला द्यावी.टपालाद्वारे येणा-या पार्सलमध्ये काही अंमली पदार्थाबाबत संशय आल्यास टपाल विभाग व प्रादेशिक परिवहन कार्यालयाने त्याची सुचना पोलिसांना द्यावी. सर्व ठाणेदारांनी खाजगी कुरीअर एजन्सीसोबत संपर्क ठेवून अंमली पदार्थाच्या वाहतुकीबाबत माहिती प्राप्त करून घ्यावी. पोलिस विभागाने अंमली पदार्थ बाळगणा-यांवर वेळोवेळी धाडी टाकाव्यात. तसेच अंमली पदार्थ सेवन करणा-यांविरुध्द कडक कारवाई करावी. एमआयडीसी परिसरातील बंद कारखान्यांची पाहणी करून तेथे अंमली पदार्थ उत्पादित होत नाही, याची खात्री करावी. रेल्वे विभागाने तेलंगणा व इतर राज्यातून संशयित रेल्वे प्रवाशांच्या सामानाची तसेच बेवारस सामानांची पडताळणी करून योग्य कारवाई करावी.

# चर्मकार समाजाचा अनुसूचित जाती उप वर्गीकरणाला आळंदी देवाची येथे एकजुटीने तीव्र विरोध

**पुणे । प्रतिनिधी**

गुरुवार दिनांक २८ मे २०२६ रोजी हराळे वैष्णवी समाज धर्मशाळा आळंदी देवाची पुणे येथे संपूर्ण राज्यातून लोक प्रतिनिधी,संघटनांचे अध्यक्ष,पदाधिकारी समाज बांधव मोठ्या संख्येने महाबैठकीत सहभागी झाले होते. सर्वांनी अनुसूचित जाती उपवर्गीकरला तीव्र विरोध केला आहे.




महा बैठकीत राज्याचे माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप, अखिल भारतीय रविदासिया धर्म संघटनेचे राष्ट्रीयअध्यक्ष सुखदेवजी वाघमारे महाराज,राष्ट्रीय चर्मकार संघाचेसंस्थापक अध्यक्ष मा.आमदार बाबुरावजी माने साहेब, माजी मंत्री (दर्जा ) ग्राहक कल्याण व चर्मकार ऐक्य महा परिषद तथा राष्ट्रीय चर्मकार संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सूर्यकांत आप्पा गवळी,वैष्णवी हराळ समाज धर्मशाळेचे अध्यक्ष बाबा कांबळे राष्ट्रीय चर्मकार संघाचे माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, राष्ट्रीय चर्मकार संघ मुंबई विभाग अध्यक्ष विलास गोरेगावकर तसेच राष्ट्रीय चर्मकार संघाचे माजी महाराष्ट्र अध्यक्ष रामपाल कदम,राष्ट्रीय चर्मकार संघाचे महाराष्ट्र कायदे सलागार अड.नारायण गायकवाड,महाराष्ट्रातील संघटनेचे नेते मोठ्या संख्येने सर्व अध्यक्ष पदाधिकारी आणि समाजसेवक सहभागी झाले होते.या बैठकीत उपवर्गीकरण विषयी चिंतन करण्यात येऊन उपवर्गीकरणाला संपूर्ण ताकतीने विरोध करून पुढचा लढा उभारण्या साठी समितीची नेमणूक करण्याचे ठरले असून राज्यातील प्रत्येक चर्मकार समाजाला या न्याय हक्काच्या चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच लवकरच मा. मुख्यमंत्री,मा.उप मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात येथे चर्मकार समाजाच्या प्रमुख प्रतिनिधींचा सहभाग करून उप वर्गीकरण व इतर महत्त्वाच्या प्रश्नासंदर्भात विशेष बैठकीचे आयोजन शासनाने करावे असा ठराव सर्वानुमते करण्यात आला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान याचे संरक्षण व्हावे तसेच उपवर्गीकरणाला तीव्र विरोध करून अनुसूचित जातीची एकजूटीची वज्रमुठ अबाधित राहण्यासाठी आंबेडकरी जनसमुदाय तसेच अनुसूचित जातीतील सर्व घटकांच्या बरोबरचर्मकार समाजाने सहभागी राहण्याचा ठराव एक मुखाने करण्यात आला आहे.शासनाने अनुसूचित जातीचा बॅकलॉग तसेच पदोन्नती तात्काळ करावी असा ठराव करण्यात आला आहे.पुढील महिन्यात शासनाचे अधिवेशन होत असून या काळात मंत्रालयावर राज्यस्तरीय धडक मोर्चा करण्यात येणार आहे राज्यातून लाखोंच्या संख्येने चर्मकार समाज बांधव सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सर्व संघटनांचे अध्यक्ष पदाधिकारी व लोकप्रतिनिधी समाज बांधव यांची एकजूट आळंदी देवाची येथील महा बैठकीत झाल्याने चर्मकार समाजाच्या न्याय हक्काचा मोठा लढा उभारण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

पुढील काळात होणारे जातीय सर्वेक्षण या संदर्भात समाजाला मार्गदर्शन करण्यात येणार असून शासनाच्या सर्वेक्षणात चर्मकार समाजाच्या प्रत्येक कुटुंबाचे सर्वेक्षण होणे महत्त्वाचे असून या सर्वेक्षणात कोणीही वंचित राहू नये याची काळजी समाज बांधवांनी घेण्याचे महत्त्वपूर्ण आहे.तरच चर्मकार समाजाचे पुढील काळात अस्तित्व टिकणार आहे.चिंतन बैठकीत मोठ्या संख्येने उपस्थित संघटनांचे अध्यक्ष प्रतिनिधी तसेच समाज बांधवांच्या मनोगतात उपवर्गीकरणा ला एक मुखाने तीव्र विरोध करण्यात आला आहे.उपस्थित असणारे मान्यवर पाहुण्यांचे स्वागत वैष्णवी हराळ समाज धर्मशाळा पदाधिकारी यांनी केले.बैठकीतचे सूत्रसंचालन संतोष कानडे यांनी केले तर आभार तुषार नेटके आणि अनिल सातपुते यांनी मानले.

# बेकायदेशीर ट्रान्सफॉर्मर शिफ्टिंग ठरली जीवघेणी; विजेच्या धक्क्याने पोखरीच्या तरुणाचा मृत्यू, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लाडेवडगाव येथे शेतातील ट्रान्सफॉर्मर (एचव्हीडीएस डीपी) दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचे बेकायदेशीर काम करत असताना, वीज पुरवठा अचानक सुरू झाल्याने विजेचा तीव्र धक्का लागून संतोष सोनेराव निकम वय ३८ वर्ष रा.पोखरी ता. अंबाजोगाई या तरुण कामगाराचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

ही घटना मंगळवार दि. २६ मे रोजी दुपारी लाडेवडगाव शिवारात घडली.कामाच्या ठिकाणी कोणतीही सुरक्षेची साधने न पुरवता,कमालीचा निष्काळजीपणा आणि हलगर्जीपणा करून मजुराच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी खाजगी कंत्राटदार सचिन भागवत शेप,शेतकरी सुभाष शाहूराव ढाकणे आणि महावितरणच्या एका लाईनमन विरुद्ध युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाडेवडगाव येथील शेतकरी सुभाष ढाकणे यांच्या शेतात 'एक शेतकरी,एक ट्रान्सफॉर्मर' या योजनेअंतर्गत महा वितरणची डीपी उभारण्यात आली होती. ही डीपी शासकीय नियम बाजूला ठेवून,शिफ्टिंग चार्ज वाचवण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय आणि त्यांना अंधारात ठेवून दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचे काम खाजगी कंत्राटदार सचिन शेप याच्या माध्यमातून सुरू होते.या कामासाठी संतोष निकम यांच्यासह इतर तीन मजुरांना रोजंदारीवर बोलावण्यात आले होते.काम सुरू करण्यापूर्वी वीज पुरवठा खंडित केल्याची खात्री करण्याचे काम लाईनमन चे होते.लाईनमनने वीज पुरवठा बंद असल्याचे सांगून तिथून पळ काढला,तर कंत्राटदार आणि शेतकऱ्याने संतोष यांना खांबावर चढण्यास सांगितले.संतोष सोनेराव निकम हे ट्रान्सफॉर्मर वरील मुख्य वायर सोडवण्यासाठी वर चढले असता,अचानक वीजप्रवाह सुरू झाला. विजेचा जोरदार झटका बसल्याने संतोष थेट खाली कोसळले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.



**कंत्राटदार लाईनमन यांचे घटनास्थळावरून पलायन**

दरम्यान अपघातानंतर कंत्राटदार सचिन शेप घटनास्थळावरून आणि रुग्णालयातून पळून गेला या घटनेची माहिती मिळताच मृताच्या नातेवाईकांनी आणि पोखरी येथील ग्रामस्थांनी अंबाजोगाई येथील महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालया समोर आक्रमक पवित्रा घेतला. दोषी कंत्राटदार, लाईनमन आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही,अशी भूमिका घेत नातेवाईकांनी तीव्र आंदोलन केले.अखेर महावितरणच्या धारूर उपविभागाचे उप कार्यकारी अभियंता गोकुळ मोरे आणि कनिष्ठ अभियंता अभिजित पाटील यांनी दिलेल्या पत्रानंतर पोलिसांनी कायदेशीर कारवाई सुरू केली. मृतक संतोष यांचे भाऊ प्रदीप सोनेराव निकम यांनी दिलेल्या जबाबा वरून युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक भीमराव मांजरे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

# शिवसेना शेतकरी परिषद महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदी मा.आ.शंकर अण्णा धोंडगे यांची निवड!



दैनिक वादळ वार्ता

**लोहा । प्रतिनिधी**

लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांची शिवसेना शेतकरी परिषदेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी जाहीर निवड करण्यात आली आहे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.महाराष्ट्रातील बळीराजाच्या, शेतकऱ्यांच्या अडचणींना वाचा फोडण्यासाठी आणि राज्यातील शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी तसेच राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या, कर्ज, पिकांचे नुकसान, सिंचनाचे प्रश्न , शेतीमालाला हमीभाव तसेच राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संघटनात्मक पातळीवर काम करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शंकर अण्णा धोंडगे यांच्या अनुभवाचा फायदा राज्यातील लाखो शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी नक्कीच होईल.या निवडीबद्दल शंकर अण्णा धोंडगे यांच्यावर संपूर्ण महाराष्ट्रभरातून, विशेषत कंधार लोहा मतदारसंघ आणि शेतकरी वर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .शंकर अण्णा धोंडगे यांनी आजवर शेतकरी चळवळीत केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यावर शिवसेना शेतकरी परिषद महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदाची मोठी जबाबदारी सोपवली आहे.

# अवैध दारूवर कारवाईसोबत व्यसनमुक्तीबाबत जनजागृती होणे आवश्यक–शिवसेना नेत्या,आमदार डॉ.नीलम गोऱ्हे

दैनिक वादळ वार्ता

**पुणे । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

हडपसरमधील पांढरे मळा परिसरात घडलेल्या विषारी दारू प्रकरणातील मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने मदत मिळावी, तसेच अशा घटना रोखण्यासाठी केवळ दारूबंदी नव्हे तर व्यसनमुक्तीच्या दिशेने ठोस पावले उचलणे अधिक गरजेचे असल्याचे मत शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.डॉ. गोऱ्हे यांनी आज घटनाग्रस्त कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार राहुल क्षीरसागर, अरुण डाडर, अशोक चव्हाण आणि विजय शर्मा यांच्या कुटुंबीयांना शिवसेना पक्ष व डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यावतीने रोख व धनादेश स्वरूपात आर्थिक मदतही देण्यात आली. याप्रसंगी, नाना भानगिरे, मारुती आबा तुपे, दत्ता खवले, संदीप शिंदे, मोहित काकडे, मयुरी बामणे, निशा थोरात यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, मृत व्यक्तींचे कुटुंबीय बहुतांश असंघटित क्षेत्रातील असल्याने प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी, तसेच ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या योजनांचा तातडीने लाभ मिळावा, कुटुंबातील इतर सदस्यांना स्वावलंबी करण्यासाठीही प्रयत्न केले जातील, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी या घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच रुग्णालयाकडून झालेल्या कथित दिरंगाईची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई व्हावी, असेही त्यांनी म्हटले. रुग्णाला तातडीने उपचार मिळण्याऐवजी आर्थिक बाबींना प्राधान्य दिले गेले. त्यामुळे काही रुग्णांना वेळेत मदत मिळू शकली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.पुणे महापालिकेनेही मृतांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान द्यावे, अशी सूचना आपण महापौर मंजुषा नागपुरे यांना दूरध्वनीवरून केली असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य सरकारही या प्रकरणात संवेदनशील असून योग्य ती मदत केली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, भरवस्तीत अवैध दारू सहज उपलब्ध असणे ही गंभीर बाब असल्याचे नमूद करत डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, केवळ पोलिसांचे निलंबन करून प्रश्न सुटणार नाही. या प्रकरणात सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. स्वस्त दारूच्या मोहापोटी नागरिक अशा हातभट्ट्यांकडे वळतात. त्यामध्ये घातक रसायने मिसळली जात असल्याने जीवितहानी होते. त्यामुळे अवैध दारूविक्री रोखण्याबरोबरच व्यसनमुक्तीबाबत व्यापक जनजागृती होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.जे लोक अशा हातभट्ट्यांवर जातात त्यांनीही आपल्या कुटुंबाचा विचार करणे गरजेचे आहे. दारूबंदीपेक्षा व्यसनमुक्तीचा मार्ग समाजासाठी अधिक परिणामकारक ठरू शकतो, असे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.



# जांब येथील मारहाण प्रकरण सामंजस्याने मिटले ऑल इंडिया पँथर सेनेची मध्यस्थी–नितीन सोनवणे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील जांब (जि. बीड) येथे अनुसूचित जातीच्या ढाकणे कुटुंबीयांशी झालेल्या वादानंतर मारहाणीची घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात दोन्ही पक्षांमध्ये निर्माण झालेला तणाव अखेर शिरूर पोलीस स्टेशनमध्ये सामंजस्याने मिटविण्यात आला.मिळालेल्या माहितीनुसार, २८ मे २०२६ रोजी सायंकाळी जांब गावातील तुषार माणिक ढाकणे, विजय ढाकणे व संगीता माणिक ढाकणे यांच्याशी शेळ्यांमुळे झालेल्या वादातून काही व्यक्तींनी जातीवाच शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत सुमारे २० जण सहभागी असल्याचे सांगण्यात येत असून संबंधित प्रकार घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याचे कुटुंबीयांनी म्हटले आहे.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी गावातील बैठकीदरम्यान तुषार ढाकणे यांना सार्वजनिकरित्या मारहाण करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.



तसेच काही व्यक्तींनी दबाव टाकल्याची व खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्याची माहिती पीडित कुटुंबीयांनी दिली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी शिरूर पोलीस स्टेशनशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांनी स्वतः पोलीस स्टेशन येथे उपस्थित राहून दोन्ही पक्ष, गावकरी व पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून चर्चा घडवून आणली.पोलीस स्टेशनमध्ये झालेल्या बैठकीत सामाजिक सलोखा व गावातील ऐक्य कायम ठेवण्याच्या दृष्टीने दोन्ही पक्षांनी सामंजस्याची भूमिका घेत प्रकरण मिटविण्यास सहमती दर्शविली. यावेळी ऑल इंडिया पँथर सेनेचे कार्यकर्ते, जांब गावातील ग्रामस्थ तसेच सामाजिक कार्यकर्ते सतीश भोसले व त्यांचे सहकारी उपस्थित होते.या प्रकरणात शिरूर पोलीस स्टेशनचे एपीआय राजेश घडवे व पोलीस कर्मचाऱ्यांनी संयमाने परिस्थिती हाताळून दोन्ही पक्षांमध्ये समन्वय साधण्यास सहकार्य केल्याबद्दल ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077